**भारताच्या उपराष्ट्रपतींचा श्रीलंका दौरा (19-20 एप्रिल 2026)**

17 एप्रिल 2026

भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री सी.पी. राधाकृष्णन 19-20 एप्रिल 2026 या कालावधीत श्रीलंकेला भेट देतील. भारताच्या उपराष्ट्रपतींचा श्रीलंकेचा हा पहिला द्विपक्षीय दौरा असेल.

2. आपल्या भेटीदरम्यान, माननीय उपराष्ट्रपती श्रीलंकेचे राष्ट्रपती, महामहिम अनुरा कुमारा दिसनायके यांची भेट घेतील. ते श्रीलंकेच्या सन्माननीय पंतप्रधान डॉ. हरिणी अमरसूर्या तसेच इतर मान्यवर आणि परदेशस्थ भारतीय नेत्यांचीही भेट घेतील.

3. श्रीलंका हा भारताच्या 'व्हिजन महासागर' तसेच 'शेजारी प्रथम' धोरणातील एक प्रमुख भागीदार आहे. माननीय उपराष्ट्रपतींचा श्रीलंका दौरा हा दोन्ही देशांमधील अलीकडील उच्च-स्तरीय संवादांच्या मालिकेनंतर होत असून, भारत आणि श्रीलंका यांना जोडणाऱ्या हजारो वर्षांपासूनच्या नागरिक परस्पर संबंधांना यामुळे आणखी बळकटी मिळेल.

**नवी दिल्ली**

17 एप्रिल 2026